अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । सोमवार, दि. २९ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ३०० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## उजनी... प्लस ३८ टक्के

सोलापूर : दौंडमधून उजनी धरणात येवून मिसळणारा विसर्ग खूपच कमी झाला आहे.रविवारी सायंकाळी ६ च्या माहितीनुसार दौंडमधून केवळ १८ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता.यावेळेपर्यंत धरण प्लस ३८ टक्क्यापर्यंत भरले होते.उजनीच्या पाणलोट क्षेत्रासह पुणे जिल्ह्यात पावसाने विश्रांती घेतली आहे तसेच वरच्या धरणांमधून विसर्गही थांबवण्यात आला आहे.



## बिल देण्याच्या कारणावरून; बाटलीने मारहाण दोघे जखमी

सोलापूर : हॉटेलमधे बिल देण्याच्या कारणावरून झालेल्या तक्रारीत काचेची बाटली आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना विजयपूर रोडवरील गुलमोहर हॉटेल येथे शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. साकीब अखलाक दिना (वय २८ रा.बेगम पेठ) आणि मिनाज मुस्ताक शेख (वय ३२ रा.शनिवार पेठ) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी रविवारी पहाटे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गुलमोहर हॉटेल येथे बिल देण्याचा कारणावरून तक्रार झाली होती. त्यावेळी परशुराम गायकवाड आणि इतर ५ जणांनी मिळून त्यांना मारहाण केली. त्यात दोघे जखमी झाले.अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

# शपथ घेताच सदाभाऊंचा हल्लाबोल, पवार-जरांगेंना सुनावले खडे बोल

## ४ वेळा सीएम झाले, नेते म्हणून मिरवले,त्यांनीच केली मराठ्यांची माती

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**ज्येष्ठ नेते शरद पवार आणि शेतकरी संघटनेचे नेते यांच्यातील राजकीय वैर सर्वश्रुत आहे. त्यांच्यात कधीच आडवे विस्तव गेलेले नाही.आजही जात नाही.शेतकरी संघटनेचे नेत्यांचे नेचर म्हणजे भयंकर आक्रमक.त्यांची भाषणे म्हणजे वर्मी घावच असतात. पवारांना ते सहन होत नाही. त्यामुळे पवार हे सहसा त्यांच्या वाटेला जात नाहीत. पण शेतकरी संघटनेचे नेते पवारांना केव्हाही आडवे-तिडवे घ्यायला हयगय करत नाहीत. रयत क्रांती या शेतकरी संघटनेचे संस्थापक आमदार सदाभाऊ खोत यांनी रविवारी पवारांवर हल्लाबोल केला.पवार चारवेळा सीएम झाले.नेते म्हणून मिरवले.त्यांनी मराठा समाजाची माती केली,अशा शब्दात खोत यांनी पवारांवर हल्ला चढवला.मनोज जरांगेंनाही टोला लगावण्यात त्यांनी हयगय केली नाही.**

### जरागेंना लगावला टोला

सरकार चर्चेसाठी तयार आहे. कायदे तज्ज्ञांना सोबत घेऊन एक चांगला मार्ग काढू. हा मार्ग महाराष्ट्राच्या हिताचा असेल. कोणतेही आंदोलन चालवत असताना सरकार आपल्याशी बोलत नसेल तर आंदोलन आक्रमक करायचे असते, सरकार आपल्याशी बोलत असेल तर संवाद आणि चर्चा करावी. यातून मार्ग निघेल. पण आंदोलन कुठे थांबवायचे हे जर समजले तर ज्यांच्यासाठी आंदोलन करतो त्यांना न्याय मिळतो, असा टोला खोत यांनी जरांगेंना लगावला.



विधान परिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या आमदारांचा रविवारी विधान भवनात शपथविधी झाला. सदाभाऊंनी शपथ घेतल्यानंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आपली भूमिका मांडताना पवारांवर टीकेची झोड उठवली.

देवेंद्र फडणवीस आणि दुसऱ्यांदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला न्याय दिला, अशा शब्दात दोघांची प्रशंसा करत आपला मोर्चा पवारांकडे वळवला.

महाराष्ट्रात मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री झाले पण त्यांनी मराठा समाजाला न्याय दिला नाही. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री झाले.

मराठ्यांचे नेते म्हणून मिरवले. पण मराठा समाजाची त्यांनी मातीच केली, असा हल्ला सदाभाऊंनी पवारांवर चढवला.

### आता विधान भवनाच्या बांधावर...

शेतीच्या बांधावरुन मला विधानभवनाच्या बांधावर उभे केले. मी भाजपासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. मी सर्व शेतकऱ्यांना न्याय देणार आहे. माझ्या या पदाचा उपयोग हा महाराष्ट्रातील सर्वसामान्य गोरगरीब जनता, कष्टकरी वर्ग आणि माझ्या बळीराजाच्या उन्नतीसाठी करेन, अशी खात्री खोत यांनी दिली. तसेच मराठा समाजासाठी आण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ असेल, सारथी सारखी संस्था असेल त्या माध्यमातून २० विद्यार्थी युपीएसीमध्ये आले. अशा अनेक योजना मराठा समाजासाठी देवेंद्र फडणवीस यांनी केल्या आहेत. त्यामुळे आरक्षणाच्या मुद्यावर राजकीय दृष्टीकोणातून न पाहता, राज्यातील ओबीसी आणि मराठा समाज गुण्यागोविंदाने राहिला पाहिजे,अशी भावना व्यक्त केली.

## विवाहित तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर/प्रतिनिधी

एका ३४ वर्षीय विवाहित तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवार पेठेतील २५६ गाळा येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली .

भरतकुमार लक्ष्मीकांत गड्डम (वय ३४ राहणार जे.१४ रविवार पेठ, २५६ गाळा) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. शनिवारी रात्री ७ वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरातील किचन मधील छताच्या लोखंडी हुकाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला होता. मयत भरतकुमार गड्डम याच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आणि आई असा परिवार आहे. तो लुम कामगार होता. पोटाच्या आजारास कंटाळून त्याने आत्महत्या केली. अशी प्राथमिक नोंद जेलरोड पोलिसात झाली. हवालदार एम.यु.माने पुढील तपास करीत आहेत.

## एक लाखाची खंडणी घेतल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

मोहोळ/प्रतिनिधी

### एका मोठ्या संघटनेचा कार्यकर्ता


मागील चार वर्षापासून चिंचोली काटी येथी एम आय डी सी तील एका कंपनीचा मालक मॅनेजर व लेखाविभागाच्या कर्मचाऱ्यास मी गावचा पुढारी आहे माझं कोणीही काहीही करु शकत नाही असे म्हणत दमदाटी करून ब्लॅकमेल करून एक लाख तीस हजार रुपयाची रोख स्वरूपात खंडणी घेतल्याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश भोसले (रा. चिंचोली काटी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहोळ तालुक्यातील चिंचोली एमआयडीसी परिसरात फिर्यादी मधुर एन मदला (रा. साई नंदन अपार्टमेंट रेल्वे लाईन जवळ सोलापूर) यांची कंपनी असून त्या ठिकाणी कंपनी व्यवस्थापक व इतर कर्मचारी काम करतात.

कंपनीकडे सरकारी नियमानुसार सर्व परवाने असूनही ८ एप्रील २०२१ रोजी ते दि. १८ जुलै २०२४ रोजी पर्यंत चिंचोलीकाटी येथीलच महेश हनुमंत भोसले याने मी गावचा पुढारी आहे, मोठा कार्यकर्ता आहे, माझं कोणी काही करीत नाही असे बोलून फिर्यादी मदला व कंपनीचे मॅनेजर, लेखा विभागाचे कर्मचारी यांना खंडणीच्या मागणी करण्याकरिता फोनद्वारे तसेच व्हाट्सअप मोबाईल वरून फोन करून तसेच नेत्याबरोबरचे काढलेले फोटो, पोलिसांसोबत काढलेले फोटो, कंपनीचे आवाराचे फोटो, कंपनीचे विरुद्ध केलेल्या अर्जाचे फोटो काढून फिर्यादीस ब्लॅकमेल करण्याकरता मोबाईलवर पाठवून तसेच व्हाट्सअप मोबाईल कॉल वर बोलून फिर्यादी कडून वेळोवेळी तसेच फिर्यादीस भीती घालून आतापर्यंत १ लाख ३० हजार रुपयांची खंडणी रोख स्वरूपात फिर्यादीच्या इच्छेविरुद्ध घेतली अशा आशयाची फिर्याद कंपनीचे मालक मधुर मधला यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून पोलिसांनी महेश भोसले याच्या विरोधात खंडणीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अंजना फाळके करीत आहेत.

## खडकवासलामधून विसर्ग वाढवला

### उजनीला पुन्हा होणार फायदा



पुणे : शहरातील खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील पाणलोट क्षेत्रात संततधार कायम असल्याने रविवारी रात्री १० वाजता ११ हजार क्युसेक वेगाने मुठा नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे.

पुण्यातील पूर ओसरल्यानंतर पुन्हा विसर्ग सुरू करण्याच्या निर्णयाने नदीकाठच्या लोकांमध्ये पुन्हा चिंता पसरली आहे. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त होण्याची शक्यताही जलसंपदा विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.

शहरात गेल्या काही दिवसांपासून संततधार सुरू आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाचा जोर कायम राहिला आहे.

धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस असल्याने खडकवासला धरणातून पाणी सोडण्यास सुरूवात झाली आहे. गेल्या गुरुवारी (२५ जुलै) खडकवासला धरणातून ४० हजार क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात आले होते.

मात्र, त्यानंतर विसर्गाचे प्रमाण वाढविण्यात आल्याने नदीला पूर येऊन नदीपात्रालगतच्या अनेक सोसायट्यांना त्याचा फटका बसला होता.

खडकवासला धरणातून मुठा नदीत पाणी सोडल्यानंतर हे पाणी भीमा नदीत येते.त्याचा लाभ सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणाला होतो.त्यामुळे उजनीची पातळी वाढण्यास पुन्हा मदत होणार आहे.

## छोटा हत्ती अपघात; जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

सोलापूर/प्रतिनिधी

सात रस्ता परिसरातील इंडिया कॅन्टीन जवळ छोटा हत्तीच्या अपघातामध्ये जखमी झालेल्या जगदेवी शंकर हसनापुरे (वय ४७, रा. ओमनम:शिवाय नगर, हत्तुरे वस्ती) या खाजगी रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी दुपारी मयत झाल्या. जगदेवी हसनापुरे या १६ जून रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास पतीच्या दुचाकी पाठीमागे बसून हत्तुरेवस्ती ते शाहीर वस्तीकडे निघाल्या होत्या.

सात रस्ता परिसरातील इंडिया कॅन्टीन जवळ पाठीमागून एमएच १३-एएन-२३३४ या क्रमांकाचा छोटा हत्ती धडकल्याने त्या खाली कोसळून गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार दाखल केले असता त्या शनिवारी दुपारी मयत झाल्या. या अपघाताची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

## हराळवाडी येथे गटात काठी व दगडाने मारहाण

कामती/प्रतिनिधी

हराळवाडी (ता.मोहोळ) येथे भावकीतील समाईक विहिरीतील पाण्याच्या भांडणातून २ गटात काठी, दगड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात कामतीच्या पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील चौघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सचिन औदुंबर शिंदे (वय ३५) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे. बुधवार आणि शुक्रवारी दुपारच्या सुमारास त्यांना कुबेर विष्णू शिंदे आणि अक्षय विक्रम शिंदे (दोघे रा. हराळवाडी) या दोघांनी विहिरीच्या पाण्याच्या वादातून काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून ठार मारण्याची धमकी दिली. असे त्याच्या फिर्यादीत नमूद आहे. तर दुसऱ्या गटातील विक्रम विष्णू शिंदे (वय ६५ रा.हराळवाडी) हे जखमी झाले. त्यांना मारहाण केल्याप्रकरणी सचिन औदुंबर शिंदे आणि त्याची पत्नी राजश्री शिंदे या दोघांवर पोलीसांनी गुन्हा दाखल केला. बुधवारी दुपारच्या सुमारास विक्रम शिंदे हे विहिरीवरील मोटर चालू करण्यासाठी गेले होते. पाईप कोण काढले? असे विचारले असता वरील दोघांनी त्यांना दगड आणि काठीने मारहाण केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे सहायक फौजदार उदार पुढील तपास करीत आहेत.

# लाडकी बहीणसाठी सोलापूर जिल्ह्यात ४ लाख अर्ज

सोलापूर/प्रतिनिधी

**मुंबईसह राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या 'मुख्यमंत्री-लाडकी बहीण योजने'ला उदंड प्रतिसाद मिळाला आहे. राज्यातील जवळपास सर्वच जिल्ह्यांत ७० टक्क्यांहून अधिक लाभार्थ्यांची नोंदणी झाल्याची माहिती महिला व बालविकास विभागातील सूत्रांनी दिली. या योजनेसाठी शनिवारपर्यंत एक कोटी २१ लाख २१ हजार १६६ अर्ज प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले. सोलापूर जिल्ह्यात ४ लाख अर्ज दाखल झाल्याची माहिती सरकारी सूत्राकडून देण्यात आली.**

## राज्यात अर्जांचा पाऊस

### सर्वाधिक अर्ज पुण्यातून

या योजनेत आत्तापर्यंत सुमारे सव्वाकोटी महिलांनी अर्ज केले असून, यात सर्वाधिक अर्ज पुणे जिल्ह्यातून प्राप्त झाले आहेत. पुण्यात शुक्रवारीपर्यंत पाच लाखांहून अधिक महिलांनी अर्ज केले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. नागपूर, नाशिक आणि सोलापूर या जिल्ह्यांत प्रत्येकी चार लाखांच्या घरात अर्ज नोंदणी झाल्याची माहिती महिला व बालविकास मंत्रालयातून देण्यात आली आहे.

या योजनेसाठी महिलांची नोंदणी प्रक्रिया वेगाने सुरू आहे. योजनेबाबत वेळोवेळी आढावा बैठका सुरू आहेत. आत्तापर्यंत १ कोटी २१ लाख २१ हजार १६६ महिलांनी अर्ज केले आहेत. त्यांची छाननी प्रक्रिया सुरू आहे. योजनेचा पहिला हप्ता १९ ऑगस्ट रोजी लाभार्थ्यांना देण्याचा आमचा मानस आहे.

**- आदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री**



या अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू असून, १९ ऑगस्ट रोजी या योजनेतील पहिला हप्ता देण्याचा मानस असल्याची माहिती मंत्रालयातील उच्चपदस्थ सूत्राकडून देण्यात आली.


महायुतीच्या सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात 'मुख्यमंत्री-लाडकी बहीण योजना' जाहीर केली. या योजनेत राज्यातील लाभार्थी महिलांना दर महिन्याला १५०० रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेचे निकषही राज्य सरकारने जाहीर केले आहेत. सध्या या योजनेसाठी महिलांना अर्ज करण्यासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, राज्यभरात १ कोटी २१ लाख २१ हजार १६६ महिलांनी अर्ज केल्याची माहिती हाती आली आहे.

सध्या राज्यातील ग्राम पंचायत आणि विधानसभानिहाय अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ग्राम पंचायत पातळीवर चावडी वाचन करीत या योजनेतील पात्र महिलांच्या यादीची माहिती देण्यात येत आहे. विधानसभानिहाय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समितीही जाहीर करण्यात आली असून, त्यानुसार देखरेख ठेवण्यात येत आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी आणि इतर पातळीवर प्राप्त माहितीनुसार, जवळपास सर्वच जिल्ह्यांत ७० ते ७५ टक्के महिलांनी अर्जाची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

दरम्यान, राज्यात गेल्या काही दिवसांपासून अतिवृष्टी सुरू असल्याने काही ठिकाणी नोंदणी प्रक्रियेचा वेग कमी असला तरी १९ ऑगस्ट रोजी या योजनेचा पहिला हप्ता लाभार्थ्यांचा खात्यावर जमा करण्यासाठी महिला व बालविकास मंत्रालयाचे प्रयत्न सुरू आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




हे बघ, तुला अजून एक पर्याय मिळालाय!